वर्ष २५ वे

अंक २ रा

## सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण
## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**इन्स्टिटयूट ऑफ इंजिनियर्स**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि.२४.०८.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा.**







# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

• यांचे मुखपत्र

# संवाद

### वसतिगृहाची वैशिष्ट्ये
(मुलांचे)

- **वाय-फाय सुविधा उपलब्ध.**
- **विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.**
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' = १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

**ऑगस्ट २०२५**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ५१००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९
**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ९ ऑगस्ट, २०२५ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२४.०८.२०२५** रोजी **सकाळी १०.३० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.२५.०८.२०२४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०२४-२०२५ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०२५-२०२६ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०२५-२०२६ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१४.०८.२०२५** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✦ आपले नम्र ✦**

**हौसाराम घोडके** – आजीव अध्यक्ष
**सुनील पोटे** – अध्यक्ष
**किरण तिकोणे** – उपाध्यक्ष
**राजाराम मुंढे** – सेक्रेटरी
**गोरक्ष जगताप** – सह सेक्रेटरी
**प्रमोद जगदाळे** – कार्यवाहक
**अशोक वाबळे** – सहकार्यवाह

**सदस्य :– इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे, डॉ.बाळासाहेब बांडे, मधुकर शिरोळे, बाजीराव जगदाळे, रामदास शिर्के, माधव गायके, सुनील निंबाळकर, सुनील कोल्हे.**

## ✦ कार्यक्रमाचे स्थळ ✦

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,**
मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
**रविवार दि. २४.०८.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - श्री.सुनील पोटे ९२२६९२१०८८**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि. २४.०८.२०२५** रोजी **सकाळी १०.०० वा. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,** मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**अध्यक्षा**

**मा.श्रीमती अरूणा अभिमान तराळ**

अध्यक्षा, मातोश्री सुलोचना प्रतिष्ठान, वाघोली

**प्रमुख पाहुण्या**

**डॉ.प्रा.सौ.अरूणा राजाराम भांबरे**

प्राचार्य, श्रीसमर्थ कॉलेज ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च, व
सहसचिव, महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी, हुजुरपागा, पुणे.

तरी आपण अवश्य उपस्थित रहावे, हि विनंती.

**आपले नम्र**

**हौसाराम घोडके** – आजीव अध्यक्ष
**सुनील पोटे** – अध्यक्ष
**किरण तिकोणे** – उपाध्यक्ष
**राजाराम मुंढे** – सेक्रेटरी
**गोरक्ष जगताप** – सह सेक्रेटरी
**प्रमोद जगदाळे** – कार्यवाहक
**अशोक वाबळे** – सहकार्यवाह

**सदस्य :- इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे, डॉ.बाळासाहेब बांडे, मधुकर शिरोळे, बाजीराव जगदाळे, रामदास शिर्के, माधव गायके, सुनील निंबाळकर, सुनील कोल्हे.**

**कार्यक्रमाचे स्थळ**

**इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स,**

मॉडर्न कॅफे चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.

**रविवार दि. २४.०८.२०२५ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - श्री.सुनील पोटे ९२२६९२१०८८**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

सन १९७९ साली स्थापन झालेल्या आपल्या मित्र मंडळाची आता सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल सुरु झाली आहे. या वर्षी मंडळाचे ४६ वे वर्ष आहे. नुकतेच मंडळाच्या नवीन तरूण फळीकडे सुत्रे देण्यात आले असून **श्री.सुनील पोटे** यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारिणी मंडळ अतिशय समर्थपणे व एकोप्याने काम करीत आहे, हे मला अभिमानाने नमूद करावेसे वाटते. नवीन नेतृत्वाने नुकतेच वडमुखवाडी येथे घेतलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे कामकाज सुरू केले असून तेथे मुली राहण्यास सुरूवात झाली आहे. अनेक वर्षांचे मुलींच्या वसतिगृहाचे मंडळाचे स्वप्न मंडळाचे आजीव अध्यक्ष **श्री.हौसाराम घोडके अण्णा व श्री.सुनील पोटे** यांच्या अध्यक्षतेखाली पूर्ण झाले आहे. सर्व कार्यकारिणी सदस्य त्यांना निरपेक्ष भावनेने पूर्ण सहकार्य करीत आहेत. घोडके अण्णांचे वयाच्या ८३ व्या वर्षीही देणगी गोळा करण्याचे काम पूर्वीच्याच उमेदीने सुरू आहे, हे मी मुद्दाम आदराने व्यक्त करीत आहे.

नेहमीप्रमाणे याही वर्षीचा **स्नेहमेळावा** तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम व वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी इंस्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, शिवाजीनगर, पुणे येथे सकाळी १० वाजता** पारनेर मित्र मंडळातर्फे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी आपल्याच तालुक्यातील महिला नेतृत्व प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. प्रतिकुल परिस्थितीतून मार्ग काढणाऱ्या वाघोली येथील मातोश्री सुलोचना प्रतिष्ठानच्या अध्यक्षा **शिवमती अरुणाताई तराळ** या अध्यक्षा तसेच **प्रा.डॉ.अरूणाताई भांबरे** या प्रमुख पाहुण्या म्हणून कार्यक्रमात मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्याबद्दल मी कार्यकारिणीतर्फे कृतज्ञता व्यक्त करतो. सर्वांनी सदर समारंभास उपस्थित राहावे असे मी आपणास आवाहन करीत आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील रत्नांची खाण असलेल्या आपल्या तालुक्यातील यजत चव्हाण या विद्यार्थ्याने इयत्ता १०वी मध्ये ९८.६०% गुण मिळवून तसेच अनुज पगार या विद्यार्थ्याने इयत्ता १२वी मध्ये ९१% गुण मिळवून तालुक्याची शान उंचावत नेली आहे. त्यांचे व इतर **सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन!** त्याचप्रमाणे पोलीस उपअधीक्षक श्री.संतोष गायके यांना राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल तसेच **'संवाद'**चे पूर्व संपादक **डॉ.दिलीप तथा दि.वा.बागुल** यांना **मानद डॉक्टरेट** मिळाल्याबद्दल आनंद वाटतो. त्यांचे मनापासून अभिनंदन! या वर्षी सर्वांमध्ये लोकप्रियता मिळविलेले पुण्याचे नायब तहसीलदार शंकरराव ठुबे यांचे अनपेक्षितपणे निधन झाले व सर्वांना मोठा धक्का बसला. त्यांना भावपूर्ण आदरांजली व्यक्त करतो.

नांदासौख्य भरे, ग्रामस्थ सत्कार, आपण असे केले तर, सेवानिवृत्ती, अभिनंदन, निधन वार्ता तसेच कर्तृत्व पारनेरकरांचे या वेगवेगळ्या सदरांमार्फत आपल्या तालुक्यातील घडामोडींची माहिती आम्ही आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहोतच! त्यासाठी आपल्याकडूनही आम्हाला माहिती मिळण्याची अपेक्षा आहेच.

**श्री.सुनिल पोटे सर व श्री.राजाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारिणी मंडळाची घोडदौड चांगल्या प्रकारे सुरू झाली असून त्यासाठी आपल्याकडूनही मार्गदर्शनाची अपेक्षा करतो.** मुलींच्या वसतिगृहाच्या सुधारणेसाठी निधी उपलब्ध होण्यासाठी आपल्या पातळीवर देणग्या मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, ही अपेक्षा व्यक्त करून माझ्या संपादकीयास अर्धविराम देतो!

**जय जिजाऊ! जय शिवराय!!**

**इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | आजीव अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| श्री.सुनील पोटे | अध्यक्ष | ९२२६९२१०८८ |
| श्री.किरण तिकोणे | उपाध्यक्ष | ९८२२३४६१३८ |
| श्री.राजाराम मुंढे | सेक्रेटरी | ९५२७४४५७५७ |
| प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.प्रमोद जगदाळे | कार्यवाहक | ९५७९६७४८१७ |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | सदस्य | ९४२२०२६२२५ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.बाजीराव जगदाळे | सदस्य | ९०११०२१४३० |
| श्री.मधुकर शिरोळे | सदस्य | ९९२२१६६१२५ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |

## वसतिगृह प्रवेशासाठी सपर्क

**मुलींचे वसतिगृह, आळंदी रोड, साईबाबा मंदिराजवळ, पुणे**

**श्री.सुनील पोटे – ९२२६९२१०८८**

**श्री.बाजीराव जगदाळे – ९०११०२१४३०**

**मुलांचे वसतिगृह, डांगे चौक, पुणे**

श्री.प्रमोद देशपांडे – ७५०७०६४५८८


श्री.दयानंद पतंगे – ९५७९८७०८३९

# विद्यार्थी गौरव १० वी – २०२५


कु.यजत राजेंद्र चव्हाण, टाकळी ढो. ९८.६% (भारती विद्यापीठात विद्यार्थ्यांमध्ये पहिला)


कु.शर्वरी सुरेश शेळके, नारायणगव्हाण, ९८%


कु.शार्दुल संदिप आवारी, रांधे, ९६%


कु.श्रावण जुगलकिशोर रेपाळे, पुणेवाडी ९५%


कु.श्रावणी राहुल बंगाळ, पुणे, ९३%


कु.गायत्री प्रशांत मातेरे, बाभुळवाडे, ९३%


कु.शंतनु सुनील सालके, जवळे, ९२.१%


कु.गार्गी गणेश थोरात, पिंपरी जलसेन, ९१%


कु.गौरी नंदकिशोर पिंगळे, पुणे, ८४%



कु. आलोक बाळासाहेब खोसे, पाडळी द. ८४%


कु.अनुष्का सचिन चाफे, पुणे, ८१%


कु. साक्षी रोहिदास खटाटे, पळशी, ७८%


कु. सुजल गिरीष आग्रे, पारनेर, ७८%


कु.अर्णव संदिप कारखिले, राळेगण थेरपाळ, ७६%


कु.मयुरेश सतीश खोसे, पाडळी द., ७६%


कु. शिवम नारायण शिंदे, पळशी, ७०%

## १२ वी सायन्स


कु. अनुज शिवप्रसाद पगार, पुणे ९१%


कु. अथर्व जीवनकुमार शिंदे पिंपरी पठार ८९%

# विद्यार्थी गौरव १२ वी सायन्स – २०२५


कु. स्वराज बाळासाहेब येणारे, रायतळे, ८६%


कु.प्रितिशा सतीश खोसे, पाडळी दर्या, ८२%


कु. वरूण चंद्रशेखर घोडके, कान्हुर, ८०%


कु.किमया रविंद्र मुनोत, म्हस्केवाडी, ८०%


कु. समृद्धी नितीन खोडदे, सांगवी, ७१%


कु. कौस्तुभ मधुसुदन जऱ्हाड, जातेगाव, ६०%


कु.अर्जुन अनिल दिघे, पारनेर, ६०%


कु.ऋषिकेश संभाजी म्हस्के, शहाजापुर, ६०%

## १२ वी कॉमर्स


कु.निशांत राजकुमार वाढवणे, पिंपरी ज. ६७%

## B.A.M.S.


कु.गायत्री जुगलकिशोर रेपाळे, पुणेवाडी, बी.ए.एम.एस.

## M.B.B.S.


कु.अनुष्का नितीन रेपाळे, पुणेवाडी, एम.बी.बी.एस.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !**

# ग्रामस्थ सत्कार

- **श्री.संतोष गुलाबराव गायके,** रा.वासुंदे हे राज्य राखीव दलात **पोलीस उपअधिक्षक** या पदावर कार्यरत असून ते सध्या फोर्स-१ प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख आहेत. त्यांना पोलीस दलातील उत्कृष्ट कामाकरीता **'राष्ट्रपती पोलीस पदक'** या सर्वोच्च सन्मानाने गौरवण्यात आले आहे.
- **इंजि.डॉ.विजयकुमार गोविंदराव ठुबे,** सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक व सहकारातील कार्यातील योगदान याचा विचार करून **अमेरिका येथील साऊथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटी** यांच्याकडून **'डाक्टरेट इन सोशल अँड कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट'** ही मानद पदवी देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले.
- **श्री.वसंत दत्तात्रय पंदरकर,** यांची द **इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनियर्स** या देशातील आघाडीच्या अभियांत्रिकी संस्थेच्या राज्य केंद्राच्या (मुंबई) **मानद सचिव** पदी बिनविरोध निवड झाली आहे. सध्या ते राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामध्ये महाव्यवस्थापक पदावर कार्यरत आहेत.
- **श्री.रामचंद्र नारायण एरंडे,** रा.वडझिरे हे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक असून त्यांची रामा एरंडे ग्रुप ही संस्था आहे. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व बांधकाम क्षेत्रातील कामगिरीबद्दल सकाळतर्फे **'सकाळ गौरव गाथा भूमिपुत्र'** पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- **पल्लवी पद्माकर आढाव,** रा.सांगवी सुर्या या मास्टर इन फॅशन मॅनेजमेंट व एम.बी.ए. मार्केटींग असून त्यांना स्नेहस्मित फाऊंडेशन पुणे या संस्थेतर्फे **'फॅशन व्यवसायातील योगदानाबद्दल श्रावण क्विन सिझन-२ उद्योगरत्न २०२५'** पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- **प्रा.विजय हरिभाऊ लोंढे,** रा.कान्हुर पठार हे टिकाराम जगन्नाथ कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असून त्यांना पारनेर साहित्य साधना मंचाचा **'पारनेर साहित्यरत्न'** पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार जेष्ठ साहित्यिक डॉ.संजय कळमकर यांच्या हस्ते देण्यात आला.
- **प्रा.डॉ.दिलीप वामन बागुल,** रा.मांडवे खुर्द, हे राष्ट्रीय प्रवचनकार व आंतरराष्ट्रीय व्याख्याते असून त्याना अमेरीकेतील वॉशिंग्टन विद्यापीठाने शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल **मानद डॉक्टरेट** पदवी प्रदान करण्यात आली.
- प्राध्या.राजाराम नानाभाऊ पागीरे रा.पिंपरी पठार यांच्या सुकन्या **डॉ.सौ.वृषाली सुमेध वायाळ,** या एम.आय.टी. कॉलेज कोथरूड येथे सहाय्यक प्रोफेसर म्हणून कार्यरत असून त्यांना डॉ.विश्वनाथ कराड एम.आय.टी. वर्ल्ड पीस युनिव्हरसिटीकडून **'अंडरवॉटर ऑब्जेक्ट डिटेक्शन इन डायनामिक बॅकग्राऊंड'** या त्यांच्या संशोधन कार्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग डोमेन, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन अभियांत्रिकी अंतर्गत **पीएचडी पदवी** प्रदान करण्यात आली आहे.
- **श्री.भिवाजी भागुजी थोरात** रा.पिंपरी जलसेन यांची **जी.एस.महानगर बँक, मुंबई** या संस्थेवर **संचालक** म्हणून निवड झाली.
- **सौ. अनिता राजू लटांबळे** (रा.पिंपळनेर) यांचा स्वतःचा शालेय विद्यार्थी वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांची दि.११/४/२०२५ रोजी **बस ओनर्स कॉन्फिडरेशन ऑफ इंडिया** च्या महाराष्ट्र राज्य पातळीवर **कार्यकारी समितीवर नियुक्ती** करण्यात आली आहे.
- **श्री. सखाराम कोंडीबा गागरे,** रा.वनकुटे यांची **श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था, सांगवी, पुणे** या संस्थेवर अध्यक्षपदी निवड झाली.
- **श्री. नितीन रामभाऊ खोडदे,** रा.किन्ही हे जी.एस.महानगर बँकेत शाखा प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. त्यांची **कर्मचारी प्रतिनिधी** म्हणून बँकेच्या संचालक मंडळावर निवड झाली.

## अभिनंदन



**डॉ. विजय बळवंत जाधव,** रा.नारायण गव्हाण हे मुंबई येथील एस.एस.के.डी. आयुर्वेदिक महाविद्यालया मधून **बी.ए.एम.एस.** ची अंतीम परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

## आपण असे केले तर

- **श्री.शंकर हरकू बर्वे,** रा.वासुंदे यांनी सुकन्या **डॉ.सौ.काजल पराग मांजरे** यांच्या **दि.१४.०२.२०२५** रोजीच्या बालाजीनगर चाकण येथील 'स्कंधा क्लिनीक' या दवाखान्याच्या उद्‌घाटनानिमित्त मंडळास **रु.१०००/–** देणगी दिली.



- **श्री.भारत मारुती जगदाळे,** रा.बाभुळवाडे यांनी सुपुत्र **चि.विराट** यांच्या **दि.२६.०४.२०२५** च्या वाढदिनानिमित्त मंडळास **रु.११०००/–** देणगी दिली.
- **श्री.गोविंदराव चिमाजी नवले,** रा. नवलेवाडी यांच्या **दि.२१.०४.२०२५ च्या सहस्त्र चंद्र दर्शन सोहळ्यानिमित्त (८१ वर्षे)** सुपुत्र **डॉ.प्रा.हरिश्चंद्र** यांनी मंडळास **रू.५०००/–** देणगी दिली.
- **श्री.बाळासाहेब रावसाहेब ठुबे,** रा.कान्हुर पठार यांनी त्यांच्या पत्नी **कै.सौ.विजया** यांच्या दि. २२.०८.२०२५ च्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.

## सेवानिवृत्ती




**प्राचार्य आप्पासाहेब तुळशीराम कळमकर,** रा. कळमकरवाडी हे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या मोशी, ता.हवेली, जि.पुणे येथील नागेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून **प्राचार्य** या पदावरून ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०२५** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.



**श्री. प्रदिप सुधाकर खराडे,** रा.टाकळी ढोकेश्वर हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये रसायन शास्त्र विभागात **वैज्ञानीक अधिकारी** या पदावर कार्यरत होते. ३७ वर्षांच्या सेवेनंतर दि.३१.०५.२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२,५००/–** देणगी दिली.

## –: निधन वार्ता :–



- **नामदेवराव बाबुराव पठारे,** वय ९६, रा. पारनेर यांचे **दि.१८.०२.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. राम यांनी मंडळास **रू. १०००/–** देणगी दिली.



- **बाबासाहेब जयवंतराव बांडे,** वय ५७, रा. टाकळी ढोकेश्वर यांचे **दि.०२.०४.२०२५** रोजी निधन झाले.



- **दिगंबर भगवंतराव वाबळे,** वय ८७, रा. घाणेगाव यांचे **दि.२७.०३.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतिप्रित्यर्थ्य सुपुत्र **श्री.अभिजीत** यांनी मंडळास **रू.११०००/–** देणगी दिली आहे.



- नायब तहसिलदार **शंकरराव तुकाराम ठुबे,** वय ५८, रा. कान्हूर पठार यांचे **दि.०६.०५.२०२५** रोजी निधन झाले.




- व्ही. एम. मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे अध्यक्ष **विष्णु उर्फ बाळासाहेब महादेव मातेरे,** वय ६७, रा. बाभुळवाडे यांचे **दि.०९.०५.२०२५** रोजी निधन झाले.



- **भागुबाई हरीभाऊ येवले,** वय ७७, रा. डिकसळ यांचे **दि. ०९.०५.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. सावकार** यांनी मंडळास रू. ५०००/– देणगी दिली.



- **श्रीमती सिंधुबाई नामदेवराव पठारे,** वय ८६, रा. पारनेर यांचे दि. **१९.०५.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. राम यांनी मंडळास **रू.** १०००/– देणगी दिली.



- **दामोदर चिमाजी फटांगडे,** वय ८७, रा. जातेगाव यांचे **दि.२६.०५.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र **श्री. एकनाथ** यांनी रू. ५०००/– देणगी दिली.



- **सौ.अंजली श्रीकृष्ण जोशी,** वय ७४, रा. कान्हूर पठार यांचे दि. ०७.०६.२०२५ रोजी निधन झाले.



- **मारुतराव आबाजी पोटघन,** वय ७८, रा. जातेगाव यांचे दि. **१७.०७.२०२५** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री. अविनाश यांनी मंडळास **रू.** २०००/– देणगी दिली.

## नांदा सौख्य भरे

- श्री. हरीभाऊ तात्याबा शेळके, रा. नारायण गव्हाण यांचे सुपुत्र **चि. रोहन** व श्री. गोरक्षनाथ पुंडलीक ठुबे, रा. माळकुप यांची सुकन्या **सौ. रेश्मा** यांचा शुभविवाह **दि. २२.१२.२०२४** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. शेळके** यांनी मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.
- श्री. संजय आप्पासाहेब झावरे, रा. गारगुंडी यांचे सुपुत्र **चि. सौरभ** व श्री. दिनेश आनंदा पाटील, रा.पुणे यांची सुकन्या **सौ. पुर्वा** यांचा शुभविवाह **दि.१७.०१.२०२५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री.संजय झावरे** यांनी मंडळास **रू.११,०००/–** देणगी दिली.
- श्री. राजेंद्र खंडु थोरात, रा. पाडळी आळे यांचे सुपुत्र **चि. निखील** व श्री. केदार प्रभाकर देवकुळे, रा. पुणे यांची सुकन्या **सौ. स्नेहा** यांचा शुभविवाह दिनांक **१३.०२.२०२५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. थोरात** यांनी मंडळास **रू.१,०००/–** देणगी दिली.
- श्री. अशोक सुखदेव गायखे, रा. कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि. ऋषीकेश** व श्री. राजेंद्र प्रल्हाद ढमढेरे, रा. कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ. साक्षी** यांचा शुभविवाह दि. १४.०४.२०२५ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री. **अशोक गायखे** यांनी **रू.५,०००/–** देणगी दिली.
- डॉ.धनंजय सिताराम शेंडकर, रा. लोणी मावळा यांचे सुपुत्र **चि. अमरेंद्र** व कै.संजय विष्णु आवाळे, रा. भोर, जि.पुणे यांची सुकन्या **सौ. पुर्वा** यांचा शुभविवाह दि. **१८.०४.२०२५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.शेंडकर यांनी मंडळास **रू.५०००/–** देणगी दिली.
- श्री. संभाजी ज्ञानदेव शेंडकर, रा. लोणी मावळा यांचे सुपुत्र **चि. लवकेश** व श्री. अर्जुन बाबुराव पवार, रा. चितळी, ता.खटाव, जि.सातारा यांची सुकन्या **सौ. गौतमी** यांचा शुभविवाह **दि. २०.०५.२०२५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. संभाजी शेंडकर** यांनी मंडळास **रू.२,०००/–** देणगी दिली.
- श्री. रामजी सखाराम आवारी, रा. रांधे यांचे सुपुत्र **चि. अतुल** व श्री. गणपत भुजंग ढमे, रा. नारोळी, ता.बारामती यांची सुकन्या **सौ. शितल** यांचा शुभविवाह **दि. ०२.०६.२०२५** रोजी संपन्न झाला.
- श्री. बाबाजी लक्ष्मण कदम, रा. पिंपरी जलसेन यांची सुकन्या **डॉ.सौ. प्राची** (एमबीबीएस, एमएस, नेत्र विशारद) व **श्री. डॉ. ओंकार** (एमबीबीएस, एमएस, नेत्र विशारद) रा. पुणे यांचा शुभविवाह **दि. ०४.०६.२०२५** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त **श्री. बाबाजी कदम** यांनी मंडळास **रू.५,००१/–** देणगी दिली.
- श्री. प्रदीप आनंदराव यादव, रा. यादववाडी यांची सुकन्या **सौ. अनुजा** व कै.गणपत निवृत्ती शेळके, रा. वाडेगव्हाण यांचे सुपुत्र **चि. वैभव** यांचा शुभविवाह दि.०६.०६.२०२५ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री. प्रदीप यादव यांनी मंडळास रू.१,०००/– देणगी दिली.

**मंडळाच्या वसतिगृहासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

## सेवानिवृत्ती



**श्री.राजेंद्र वसंतराव पोळ,** रा. पळशी हे बजाज ऑटो कंपनीत असिस्टंट मॅनेजर या पदावर कार्यरत होते. ते ३६ वर्षे ६ महिन्यांच्या सेवेनंतर दि.३०.०६.२०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१,१००/–** देणगी दिली.

**श्री. सदाशिव ग. थोरात**

**मो.नं. ७८७५०३३९३३, ९४०५१०८६८७**

**हर्षल एंटरप्रायजेस**

**आमच्याकडे पुणे महानगपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सर्व प्रकारच्या एन.ओ.सी. व सर्व प्रकारचे नळ व ड्रेनेज कनेक्शनची कामे योग्य दरात केली जातील.**

**Email : thorat7077@gmail.com**

**ऑफिस – सुंदर भवन, घ.नं.२९१/९२, अमराळे हाऊस शेजारी, शिवाजीनगर, पुणे – ५**

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये-

*** संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय * तत्पर सेवा * ठेवीवर आकर्षक व्याजदर**
*** सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार * विनयशील कर्मचारी वर्ग**
*** सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.**



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
अध्यक्ष



सौ.मंदाकिनी दिलीप तनपुरे
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.नामदेव बालाजी कोकाटे
संचालक



श्री.प्रथमेश दिलीप हरेल
संचालक



सौ.सुमन रामदास शिर्के
संचालिका



सौ.मनिषा सचिन चौधरी
संचालिका



सौ.अनिता शैलेंद्र पोटघन
संचालिका

## मुदत ठेव व्याजदर

(०१.०९.२०२२ पासून लागू)

| | |
|---|---|
| ४६ दिवस पुर्ण ३% | ६ महिने पुर्ण ४% |
| ०९ महिने पुर्ण ५% | १२ महिने पुर्ण ७% |
| जेष्ठ नागरिक ०.५% जास्त | |
| मासिक व्याज ६.५% | |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०२४ ते ३१.०३.२०२५ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | |
| रोख | १४,९७३.०० | |
| स्टेट बँक २०७५४ | ३१,१९४.४७ | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | ७७,५०१.२५ | |
| महानगर को-ऑप.बँक ४४५ | २,१२,४३१.२१ | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | २६,४२८.६७ | |
| | ---------- | ३,६२,५२८.६० |
| इमारत निधी | | १९,०३,९१०.०० |
| **बँक व्याज -** | | |
| मुदत ठेव व्याज खाते | १,५१,१९८.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | ३,७२१.०० | |
| | ---------- | १,५४,९१९.०० |
| **इतर जमा** | | |
| फॉर्म फी | २,९७०.०० | |
| वसतिगृह विज बिल जमा | २,०१,२५२.०० | |
| वसतिगृह दंड | ८५,५१८.०० | |
| वसतिगृह देखभाल शुल्क | १,०४,०००.०० | |
| टी डी एस परतावा व्याज | २,९५४.०० | |
| अभ्यासिका फी | ५८,५५०.०० | |
| किरकोळ जमा | २२७.०० | |
| रद्दी विक्री जमा | १,७५०.०० | |
| | ---------- | ४,५७,२२१.०० |
| महाराष्ट्र सरकार सांस्कृतिक विभाग अनुदान | | ९,३०,०००.०० |
| वसतिगृह शुल्क | | २८,१४,६२१.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझीट) | | २,७६,०००.०० |
| टी.जी.एस. ठेकेदार | | १४,५३०.०० |
| मुदत ठेव | | १,००,६३,८१९.०० |
| मुदत ठेव व्याज येणे | | ३,१०,५९०.०० |
| टी.डी.एस. मालमत्ता खरेदी | | १,०५,०००.०० |
| टी.डी.एस. २०२२-२०२३ | | ११,६६७.०० |
| टी.डी.एस. २०२३-२०२४ | | ५६,४९९.०० |
| **एकूण रक्कम** | | **१,७४,६१,३०४.६०** |

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **व्यवस्थापन खर्च** | | |
| टायपींग व झेरॉक्स खर्च | ४,५४५.०० | |
| लिहीणावळ खर्च | १८,०००.०० | |
| बँक चार्जेस | ७,७९९.०८ | |
| कन्सल्टन्सी खर्च | १,००,०००.०० | |
| कायदे खर्च | २,८०१.०० | |
| मासिक सभा खर्च | ३,२८४.०० | |
| ऑफिस खर्च | ६९०.०० | |
| पोस्टेज खर्च | ८००.०० | |
| छपाई खर्च | ३७,५०९.०० | |
| प्रोफेशनल चार्जेस | ३१,०००.०० | |
| स्नेह संमेलन खर्च | ३८,७९३.०० | |
| स्टेशनरी खर्च | २,१८७.०० | |
| प्रवास खर्च | ९,३००.०० | |
| | -------- | २,५६,७०८.०८ |
| **उद्देशांवरील खर्च** | | |
| लोकोत्सव सांस्कृतिक खर्च | ७,००,०००.०० | |
| मुलींचे वसतिगृह खर्च | २,३१,७१८.०० | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | १,२७,९७०.०० | |
| पगार खर्च | ७,२८,४७५.०० | |
| सफाई खर्च | ५७,५४६.०० | |
| इलेक्ट्रीकल खर्च | ५,२१२.०० | |
| वीजबील खर्च | ४,२८,८८०.०० | |
| उत्सव समारंभ खर्च | १८,५६४.०० | |
| इंटरनेट चार्जेस | १,१७,६००.०० | |
| पाणी टँकर खर्च | ८,७२८.०० | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| | --------- | २४,३३,६९३.०० |
| पी.सी.एम.सी.कर | | १,४२,६८०.०० |
| ऑडिट फी | | २०,०००.०० |
| कायदे फी | | १२,०००.०० |
| किरकोळ खर्च | | २,३२५.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझिट) | | २,२५,५००.०० |
| टी.डी.एस.ठेकेदार | | ८,१३०.०० |
| मुदत ठेव | | १८,६०,४०७.०० |
| मुदत ठेव व्याज येणे | | ३५,४०४.०० |
| टी.डी.एस. मालमत्ता खरेदी | | १,०५,०००.०० |
| टी.डी.एस. २०२४-२०२५ | | ३७,५८९.०० |
| **मुलींचे वसतिगृह खरेदी** | | |
| वसतिगृह | १,०५,०२,०००.०० | |
| स्टॅम्प ड्युटी व नोंदणी फी | ८,३५,०००.०० | |
| खोलींचे नुतनीकरण | २,३५,३३०.०० | |
| | ---------- | १,१५,७२,३३०.०० |
| **अखेर शिल्लक -** रोख | ९,५५०.०० | |
| स्टेट बँक २०७५४ | २९,०६७.२७ | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | ७६,४९१.५५ | |
| महानगर को-ऑप.बँक ४४५ | ६,०५,७७३.०३ | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | २८,६५६.६७ | |
| | --------- | ७,४९,५३८.५२ |
| **एकूण रक्कम** | | **१,७४,६१,३०४.६०** |

| **हौसाराम घोडके** | **सुनील पोटे** | **किरण तिकोणे** | **राजाराम मुंढे** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|---|
| आजीव अध्यक्ष | अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे


## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०२४ ते ३१.३.२०२५ अखेरचे


| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **व्यवस्थापन खर्च** | | | **बँक व्याज** | | |
| टायपींग व झेरॉक्स खर्च | ४,५४५.०० | | मुदत ठेव व्याज खाते | १,५१,१९८.०० | |
| लिहीणावळ खर्च | १८,०००.०० | | बचत ठेव व्याज खाते | ३,७२१.०० | |
| बँक चार्जेस | ७,७९९.०८ | | | ------- | १,५४,९१९.०० |
| कन्सल्टन्सी खर्च | १,००,०००.०० | | | | |
| कायदे खर्च | २,८०१.०० | | **इमारत जमा** | | |
| सभा खर्च | ३,२८४.०० | | फॉर्म फी | २,९७०.०० | |
| ऑफिस खर्च | ६९०.०० | | वसतिगृह विज बिल जमा | २,०१,२५२.०० | |
| पोस्टेज खर्च | ८००.०० | | वसतिगृह दंड | ८५,५१८.०० | |
| छपाई खर्च | ३७,५०९.०० | | वसतिगृह देखभाल शुल्क | १,०४,०००.०० | |
| प्रोफेशनल चार्जेस | ३१,०००.०० | | टी.डी.एस.परतावा व्याज | २,९५४.०० | |
| स्नेह संमेलन खर्च | ३८,७९३.०० | | अभ्यासिका फी | ५८,५५०.०० | |
| स्टेशनरी खर्च | २,१८७.०० | | किरकोळ जमा | २२७.०० | |
| प्रवास खर्च | ९,३००.०० | | रद्दी विक्री जमा | १,७५०.०० | |
| | -------- | २,५६,७०८.०८ | | ---------- | ४,५७,२२१.०० |
| **उद्देशांवरील खर्च** | | | | | |
| सांस्कृतीक खर्च | ७,००,०००.०० | | | | |
| मुलींचे वसतिगृह खर्च | २,३१,७१८.०० | | महाराष्ट्र सरकार सांस्कृतिक | | ९,३०,०००.०० |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | १,२७,९७०.०० | | विभाग अनुदान | | |
| पगार खर्च | ७,२८,४७५.०० | | | | |
| सफाई खर्च | ५७,५४६.०० | | वसतिगृह शुल्क | | २८,१४,६२१.०० |
| शैक्षणिक मदत | ५,०००.०० | | | | |
| इलेक्ट्रीकल खर्च | ५,२१२.०० | | | | |
| वीजबील खर्च | ४,२८,८८०.०० | | | | |
| उत्सव समारंभ खर्च | १८,५६४.०० | | | | |
| इंटरनेट चार्जेस | १,१७,६००.०० | | | | |
| पाणी टँकर खर्च | ८,७२८.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| | --------- | २४,३३,६९३.०० | | | |
| पी.सी.एम.सी.कर | | १,४२,६८०.०० | | | |
| ऑडिट फी | | २०,०००.०० | | | |
| कायदे फी | | १२,०००.०० | | | |
| किरकोळ खर्च | | २,३२५.०० | | | |
| घसारा इमारत | | १३,०५,९८४.०० | | | |
| घसारा फर्निचर | | १,३०,९०२.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ५२,४६८.९२ | | | |
| **एकूण रक्कम** | | ४३,५६,७६१.०० | **एकूण रक्कम** | | ४३,५६,७६१.०० |

| **हौसाराम घोडके** | **सुनील पोटे** | **किरण तिकोणे** | **राजाराम मुंढे** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|---|
| आजीव अध्यक्ष | अध्यक्ष | उपाध्यक्ष | सेक्रेटरी | लेखा परीक्षक |

## आपण असे केले तर

- **श्री.सुभाष रामभाऊ सोनवणे,** रा.निघोज यांनी पिताश्री **रामभाऊ सावळेराम सोनवणे** यांच्या **दि.०१.०१.२०२५** रोजीच्या व मातोश्री **बबईबाई रामभाऊ सोनवणे** यांच्या **दि.०७.०८.२०२५** च्या स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रु.२०००/–** देणगी दिली.




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.

संपादकीय पत्ता :
**इंजि.डॉ.विजयकुमार ठुबे**
ए-६०५, "शुभकल्याण" नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
**आजीव अध्यक्ष,** पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०